# भूमिका

# भू मि का

रत्नाकर मतकरी यांच्या ' जौळ ' कादंबरीत मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनातील एक संघर्ष आणि त्यातून उद्भवलेली शोकांतिका ही चित्रित केली असून त्या कादंबरीने मराठी वाचकांना अस्वस्थ केले. कौटुंबिक जीवनाशीच सामाजिक स्वास्थ्य निगडीत असल्याने ह्या कादंबरीस कौटुंबिक, सामाजिक परिमाण लाभले. तसेच कादंबरीकाराने हाच कौटुंबिक प्रश्न त्यातल्या संघर्षासह पण थोडया वेगळ्या पद्धतीने ' माझं काय चुकलं ? ' या नाटकात रुपांतर करुन तोही रसिकांसमोर सादर केला. त्यामुळेच या कादंबरीचा अभ्यास करावा त्यातल्या कौटुंबिक सामाजिक प्रश्नांचे स्वरुप पहावे, कादंबरीतील आशय, अभिव्यक्तीतून तिचे यथातथ्यपणा नोंदवावे यासाठी मी उद्युक्त झाले, आणि विशिष्ट अशा प्रकारची अभ्यासपद्धती अनुसरुन हा चिकित्सक अभ्यास पूर्ण केला.

अभ्यास पद्धती :

| | | |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | : | मराठी कादंबरीची वाटचाल : एक त्रोटक आढावा, ह.ना. आपटे ते रत्नाकर मतकरी. |
| प्रकरण दुसरे | : | 'जौळ' कादंबरीचे स्वरुप |
| प्रकरण तिसरे | : | 'जौळ' मधील संघर्षाचे स्वरुप |
| प्रकरण चौथे | : | कौटुंबिक जीवन : व्यक्तिगत आणि सामाजिक संदर्भात. |

प्रकरण पाचवे : ' जोड ' कादंबरीच्या आशयाच्या संदर्भात 'माझं काय चुकलं ? ' नाटक.

प्रकरण सहावे : ' जोड ' कादंबरी आणि 'माझं काय चुकलं ?' नाटक : रूपविधान.

प्रकरण सातवे : निष्कर्ष.

लेखकाने ' जोड ' कादंबरीत मांडलेल्या प्रश्नांना ' माझं काय चुकलं ?' या नाटकातून दिलेले उत्तर, सुचविलेला उपाय हाही या अभ्यासात लक्षात आला. आणि दोन वाङ्•मय प्रकार हाताळून देखील कलावंताचे एकात्मरूप ध्यानी आले. या कादंबरीच्या निमित्ताने केवळ कौटुंबिक प्रश्नच निर्माण केले आहेत, असे नव्हे तर कौटुंबिक संघर्षातून निर्माण होणारे काही सामाजिक प्रश्न ही उपस्थित केले आहेत. यादृष्टीनेच एकूण विवेचन केले आहे. चर्चा आणि चिकित्सा यातून लेखकाच्या वाङ्•मयीन निर्मितीबरोबरच कौटुंबिक, सामाजिक प्रश्नांचा अनुभवाला येणारा प्रत्यय विवरून दाखविला आहे. कादंबरी, नाटक यांची चिकित्सा करीत असताना कलावंताच्या कलात्म निर्मितीचा कसदारपणा हाही ध्यानी आला आणि कलावंत म्हणून त्याचे असलेले मोठेपण जाणवले.

.:. .:. .:.